मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा! : ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शनिवार, दि. 10 ऑगस्ट 2024 | पान- 1

# अन् गांधीजी अवतरले चिंचवड रेल्वे स्थानकावर..!

**प्रसंगाचे अभिरूप दर्शन रेल्वेस्थानकावर महात्मा गांधी विचार जागर : शब्दधन काव्यमंचाने ऐतिहासिक कवी संमेलनाचे आयोजन केले होते**

**पिंपरी | प्रतिनिधी**

क्रांती दिनानिमित्त शुक्रवार (दि.9) दुपारी मुंबईहून येणाऱ्या रेल्वेतून ब्रिटिश अधिकाऱ्या समवेत चिंचवड रेल्वे स्थानकावर चक्क महात्मा गांधीजी उतरले अन् त्यांच्या जयघोषाच्या जल्लोषाने प्रवासी चकित झाले. 9 ऑगस्ट 1942 रोजी 'चले जाव!' आंदोलन पुकारल्यामुळे महात्मा गांधी यांना अटक करून पुण्यात पाठविण्यात आले होते; परंतु जनक्षोभ उसळू नये म्हणून चिंचवड रेल्वेस्थानकावर त्यांना उतरवून घेण्यात आले होते. शब्दधन काव्यमंचाने या प्रसंगाचे अभिरूप दर्शन घडवून रेल्वेस्थानकावर महात्मा गांधी विचार जागर या ऐतिहासिक कवी संमेलनाचे आयोजन केले होते.

ज्येष्ठ साहित्यिक डॉ. पी. एस. आगरवाल महात्मा गांधींच्या आणि सुभाष चव्हाण इंग्रज अधिकाऱ्याच्या वेशभूषेत सहभागी झाले होते; तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत सह संयोजक प्रकाश क्षीरसागर अध्यक्षस्थानी होते. ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांत चौगुले, चिंचवड प्रवासी संघाचे अध्यक्ष गुलामअली भालदार, उपाध्यक्ष मुकेश चुडासामा, चिंचवड रेल्वेस्थानक प्रबंधक मॅथ्यू जॉर्ज, ज्येष्ठ साहित्यिक अरुण बोऱ्हाडे, अशोक महाराज गोरे, राजेंद्र घावटे, कैलास भैरट, प्रकाश घोरपडे, शब्दधन काव्यमंचाचे अध्यक्ष सुरेश कंक यांची प्रमुख उपस्थिती होती.

बाल कवयित्री सानिका जोशी पासून ते ज्येष्ठ कवयित्री राधाबाई वाघमारे यांच्यापर्यंत सुमारे तीस कवींनी देशभक्तिपर रचनांनी वीरश्रीपूर्ण वातावरणनिर्मिती केली होती. यामध्ये शोभा जोशी, अरुण कांबळे, सीमा गांधी, बाळकृष्ण अमृतकर, शामला पंडित, आय. के. शेख, अण्णा जोगदंड, अण्णा गुरव, योगिता कोठेकर, शामराव सरकाळे, आत्माराम हारे, रशिद अत्तार, जयवंत पवार यांच्या रचना उल्लेखनीय होत्या.





### प्रसंगाचे अभिरूपदर्शन

» महात्मा गांधी यांनी 'चले जाव' आंदोलन पुकारल्यामुळे त्यांना अटक झाली. दिनांक ९ ऑगस्ट १९४२ ला पुण्यातील येरवडा कारागृहात आणले जात होते. परंतु जनक्षोभ उसळू नये, म्हणून चिंचवड रेल्वेस्थानकावर त्यांना उतरले होते. या घटनेची आठवण शब्दधन काव्यमंचाने या प्रसंगाचे अभिरूपदर्शन घडवून आणले. तसेच रेल्वेस्थानकावर महात्मा गांधी विचारजागर या ऐतिहासिक कविसंमेलन घेण्यात आले.

# महापालिकेने चिंचवड मतदारसंघातील रस्त्यांच्या कामासाठी काढलेल्या निविदा प्रक्रियेत रिंग!

**पालिका आयुक्तांनी रद्द केल्या 92 कोटींच्या निविदा, चिंचवडमधील चार रस्ते कामात ठेकेदार कंपन्या आढळल्या दोषी, रस्ते कामाच्या फेरनिविदा काढण्यात येणार आहेत**

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या प्रशासकीय राजवटीत अंदाधुंद कारभार सुरू आहे. शहरातील रस्त्यांच्या ९० कोटींच्या नऊ कामांवर विविध आक्षेप नोंदवण्यात आले होते. त्या कामातील त्रुटींची तक्रार करण्यात आली होती. त्यामुळे स्थापत्य विभागाकडून पडताळणी सुरू केली. या कामामध्ये ठेकेदार कंपनीची कागदपत्रे, टर्न ओव्हर, बँकेची कागदपत्रे तपासली गेली. ठेकेदार संस्थांच्या अनुभव प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात आली. त्यामुळे चिंचवडमधील चार रस्ते कामात ठेकेदार कंपन्या दोषी आढळल्याने सुमारे ९२ कोटी रुपयांच्या निविदा अखेर रद्द करण्यात आल्या आहेत. त्या रस्ते कामाच्या फेरनिविदा काढण्यात येणार आहेत.

महापालिकेने चिंचवड विधानसभा मतदारसंघातील नऊ रस्त्यांच्या कामासाठी काढलेल्या निविदा प्रक्रियेत रिंग झाल्याचा आरोप झाला होता. महापालिकेच्या निविदाप्रक्रियेत अटी-शर्तींची पूर्तता करत नसताना काही ठेकेदार पात्र, तर पात्र असूनही काहींना अपात्र करण्यात आल्याचा आरोप झाला होता.



### निविदा प्रक्रियेत दोषी, जबाबदार कोण?

» निविदाप्रक्रियेत दोष असल्याचे पुढे आल्यामुळेच चार कामांच्या निविदा रद्द करण्याचा निर्णय प्रशासनाला घ्यावा लागला. निविदा अटी-शर्ती निश्चिती, ठेकेदार पात्र-अपात्र करण्याची प्रक्रिया यातील त्रुटींमुळे निविदा रद्द झाली. याची जबाबदारी कोणाची आणि कोणावर कारवाई होणार की नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### पुण्यात काँग्रेसची बॅनरबाजी

» चिंचवडमधील चार कामांच्या एकूण ९२ कोटी १२ लाख २९ हजार ५०५ रुपयांच्या निविदा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामध्ये बोपदेव मंदिर किवळे ते एक्स्प्रेस हायवेपर्यंतचा १८ मीटर डीपी रस्ता (१५ कोटी ६५ लाख ३२ हजार ९९१ रुपये), विकासनगर येथील मुख्य रस्ता व इतर डांबरीकरण (१५ कोटी ६२ लाख ९८ हजार ४०४ रुपये), मुकाई चौकापासून लोढा प्रकल्पापर्यंत एक्स्प्रेस हायवे लगतचा रस्ता (२३ कोटी ५८ लाख ६ हजार ७४४ रुपये), पवना नदीवर मामुर्डी ते सांगवडे जोडणारा पूल बांधणे (३७ कोटी २५ लाख ९१ हजार ३६६ रुपये) या कामांचा समावेश आहे. निविदा रद्द करून पुन्हा या कामांसाठी निविदाप्रक्रिया राबविण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

# लाडकी बहीण योजनेवर काँग्रेसची शहरात बॅनरबाजी

## पुणे शहरात रस्त्यांवरील खड्ड्यांविरोधात काँग्रेस पक्ष आक्रमक झाला तीन खड्ड्यांनी काँग्रेसने खड्डानाथ, खड्डादादा, खड्डेंद्र...अशी नावे दिली आहेत

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरात रस्त्यांवरील खड्ड्यांविरोधात काँग्रेस पक्ष आक्रमक झाला आहे. तीन खड्ड्यांनी काँग्रेसने खड्डानाथ, खड्डादादा, खड्डेंद्र...अशी नावे दिली आहेत. महायुती सरकारवर जोरदार टीका काँग्रेसने केली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सरकारने राज्यात लाडकी बहीण योजना सुरु केली आहे. त्या योजनेसाठी राज्यभरातील सेतू कार्यालये आणि तहसील कार्यालयात अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. या योजनेवर उपरोधिक टीका विरोधकांकडून सुरु आहे.

पुणे शहरातील अनेक रस्त्यांवर खड्डे निर्माण झाले आहे. यामुळे पुण्यात काँग्रेस कार्यकर्त्यांकडून अनोखी उपरोधिक बॅनरबाजी सुरु आहे. मुख्यमंत्री माझा लाडका खड्डा योजना २०२४ नावाने स्पर्धा भरवली आहे. त्याचे बॅनर शहरात लावले आहे. विशेष म्हणजे राज्य सरकारच्या लाडकी बहीण योजनेच्या बॅनर शेजारीच हे बॅनर लावले आहे. त्यामुळे त्याची चांगलीच चर्चा रंगली आहे.




### काय म्हटले बॅनरमध्ये

» आपल्या भागातील अत्यंत धोकादायक खड्डा पाठवण्याचे आवाहन काँग्रेसने केले आहे. या स्पर्धेत सहभागी घेतलेल्या नागरिकांना जागरूक नागरिक पुरस्कार दिला जाणार असल्याचे म्हटले आहे. तसेच अत्यंत तीन धोकादायक खड्डे पाठवून जीव वाचवल्याबद्दल पंधराशे रुपये रोख बक्षीस दिले जाणार आहे. या तीन खड्ड्यांनी काँग्रेसने खड्डानाथ, खड्डादादा, खड्डेंद्र...अशी नावे दिली आहेत. महायुती सरकारवर जोरदार टीका काँग्रेसने केली आहे.

'लाडकी बहीण, लाडकी बहीण करताय, यापेक्षा आम्हा महिलांना सुरक्षित वातावरण हवंय. आम्हाला 1500 रुपये देऊन, तुम्ही आमचं मत घेऊ इच्छिता. पण आमचं मन यात रमलेलं नाही. माझ्या माता-भगिनींच्या मुलाला नोकरी हवी, बापानं अन पतीने शेतात घाम गाळून पिकविलेल्या पिकाला भाव हवाय. आम्हाला चिंता असते, पिकाला भाव मिळाला नाही तर माझा बाप आत्महत्या करणार नाही ना? माझ्या भावाच्या हातात नोकरी असेल तर आम्हाला रक्षाबंधनाला माहेरी जाण्यात आनंद आहे?

तुमच्या 1500 रुपयांमध्ये हे सुख मिळणार आहे का? पण या निर्लज्ज सरकारला याचं काही देणं-घेणं नाही. त्यामुळं ह्यांना महिला अद्याप समजल्या नाहीतच. ह्यांना वाटतं महिलांचे मन फक्त पैशात अडकले आहे' असं म्हणत सरकारच्या लाडकी बहीण योजनेवर सडकून टीका केली.

राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना सुबत्ता आणि आधार देण्याच्या हेतून 'लाडकी बहिण' योजना सुरु कपरण्यात आली. मात्र यापेक्षा महिलांना नेमकं काय हवंय?

### पुण्यात काँग्रेसची बॅनरबाजी

» नागरिकांनी पाठवलेले खड्डे महापालिकेकडून दुरुस्त केले गेले नाही, तर आम्ही ते स्वतः दुरुस्ती करु, असे या बॅनर्सवर म्हटले आहे. पुण्यातील खड्ड्यांचा विषय त्यामुळे चर्चेत आणण्यात आला आहे. दुसरीकडे पुणे मनपाने खड्डा बुजण्यासाठी मोहीम सुरु केली आहे. नागरिकांसाठी हेल्पलाईन क्रमांक दिला आहे. त्या क्रमांकावर फोटो पाठवल्यावर २४ तासांत खड्डा बुजवला जाणार असल्याचे पुणे मनपाने म्हटले आहे.

### काय आहे बॅनरमध्ये

» पुणे शहरात रस्त्यांवरील खड्ड्यांविरोधात काँग्रेस पक्ष आक्रमक झाला आहे. यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांचे नाव साधर्म्य करुन सर्वोत्कृष्ट धोका खड्डानाथ, सर्वोत्कृष्ट बारा खड्डादादा आणि सर्वोत्कृष्ट मोठा खड्डेंद्र असे बक्षिस ठेवल्याचे बॅनर लागले आहे. राज जाधव आणि संकेत गलांडे यांनी हे बॅनर लावले आहेत.

# भिडेवाड्यातील राष्ट्रीय स्मारकाचे भूमिपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार

## यानिमित्ताने पुण्यात येणाऱ्या पंतप्रधान मोदींच्या उपस्थितीत महायुतीकडून विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा नारळ फोडला जाणार आहे

**पुणे | प्रतिनिधी**

महात्मा जोतिबा आणि सावित्रीबाई फुले यांनी मुलींची पहिली शाळा सुरू केलेल्या भिडेवाड्यातील राष्ट्रीय स्मारकाचे भूमिपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. येत्या १६ ऑगस्ट रोजी हा कार्यक्रम पुण्यात होणार आहे. कार्यक्रमाचे ठिकाण अद्याप निश्चित झालेले नसले, तरी पंतप्रधान या वाड्याला भेट देणार असल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली.

यानिमित्ताने पुण्यात येणाऱ्या पंतप्रधान मोदींच्या उपस्थितीत महायुतीकडून विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा नारळ फोडला जाणार आहे. या भूमिपूजनासह स्वारगेट ते जिल्हा न्यायालय या भुयारी मेट्रो मार्ग, स्वारगेट- कात्रज मार्गाचे भूमिपूजन आणि वाघोली, तसेच चांदणी चौकापर्यंत मेट्रोच्या विस्तारीत मार्गाचे कामही यानिमित्ताने सुरू केले जाण्याची शक्यता आहे. महापालिकेच्या पूर्ण झालेल्या प्रकल्पाचे उद्‌घाटन, तसेच काही प्रकल्पांचे भूमिपूजन करण्याचे नियोजनही प्रशासनाकडून सुरू आहे. शासनाकडून याबाबतचे निर्देश नुकतेच महापालिकेस देण्यात आले आहेत. सर्वोच्च न्यायालयानेही हेच आदेश कायम ठेवले. भूसंपादनाचा मार्ग मोकळा झाल्यानंतर महापालिकेने डिसेंबर २०२३ मध्ये तातडीने हा वाडा भुईसपाट करून जागा ताब्यात घेतली. या कामासाठी सात कोटी २६ लाख ४८ हजार रुपये खर्च अपेक्षित आहे.



### असे आहे स्मारक

» तत्कालिन कालसुसंगत बाह्यरूप
» तळघरात दुचाकींसाठी वाहनतळ
» वर तीन मजली बांधकाम
» फुले दाम्पत्याचे पुतळे
» फुले दाम्पत्याच्या कार्याविषयी दृकश्राव्य माहिती

### असे आहे स्मारक

» शिवाजी रस्त्यावरील सुमारे पावणेतीन गुंठे जागेतील भिडेवाडा मोडकळीस आला होता. तिथे स्मारक उभारण्याचा निर्णय अनेकदा घेतला गेला. मात्र, वाड्यातील भाडेकरूंनी न्यायालयात धाव घेतल्याने भूसंपादन रखडले होते. उच्च न्यायालयाने योग्य मोबदला देऊन भूसंपादन करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयानेही हेच आदेश कायम ठेवले. त्यामुळे भूसंपादनाचा मार्ग मोकळा झाल्यानंतर महापालिकेने डिसेंबर २०२३ मध्ये तातडीने हा वाडा भुईसपाट करून जागा ताब्यात घेतली. या कामासाठी सात कोटी २६ लाख ४८ हजार रुपये खर्च अपेक्षित आहे.

# पिंपरी-चिंचवडलाही होणार आयआयएम

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विकासकामांना 'ग्रीन सिग्नल' : भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला "महायुतीचे बळ"

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडसह भोसरी विधानसभा मतदार संघातील पिंपरी-चिंचवडकरांची जीवनशैली उंचावण्याद्दृष्टीने महत्त्वपूर्ण विकासकामे आणि प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'ग्रीन सिग्नल' दिला आहे. त्यामुळे महायुती सरकारकडून पिंपरी-चिंचवडकरांना 'मान्सून गिफ्ट' मिळाले आहे.

भोसरी विधानसभा मतदार संघासह पिंपरी-चिंचवडशी संबंधित प्रलंबित प्रश्न व विकासकामांसाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या मागणीनुसार, मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली.

यावेळी पुणे जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे, महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, नगररचना विभागाचे संचालक प्रसाद गायकवाड यांच्यासह राज्य शासनाच्या विविध विभागाचे अप्पर सचिव, महसूल विभागाचे संचालक आणि अधिकारी उपस्थित होते.



**बैठकीतील महत्त्वपूर्ण निर्णय पुढीलप्रमाणे :**

1. पिंपरी-चिंचवड शहरामध्ये 'आयआयएम' शाखा सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी ७० एकर जागा निश्चित केली आहे.

2. पिंपरी-चिंचवडमध्ये रेड झोन, ब्ल्यू लाईनसारख्या प्रतिबंधित क्षेत्रासाठी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) व वार्षिक मूल्यदर निर्देशांकमध्ये (READY RECKONER) सुधारणा करणेबाबत नोटिफिकेशन काढण्याच्या सूचना नगरविकास विभागाला दिल्या आहेत.

3. पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील गृहयोजनेतील 1 ते 42 पेठांमधील 11 हजार 223 सदनिका पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडे हस्तांतरण करण्याची कार्यवाही करावी, अशा सूचना नगरविकास विभागाला दिल्या आहेत.

4. पुणे-पिंपरी-चिंचवडमधील वाढती लोकसंख्या आणि सार्वजनिक प्रवासी वाहतूक सक्षम करण्यासाठी मेट्रोच्या नवीन मार्गाचा विस्तार करण्याबाबत 'डीपीआर' करावा, असे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

5. पिंपरी-चिंचवडमधील डुडूळगाव येथील वनक्षेत्रावर इको टुरिझम पार्क विकसित करणेबाबत १५ दिवसांत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

6. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय भवन उभारण्यासाठी नवीन इमारत बांधकाम प्रशासकीय बांधकाम मान्यता व निधीबाबत प्रस्तावास मान्यता देण्याचे आश्वासन दिले आहे.

7. भोसरी विधानसभा मतदार संघातील महावितरण संदर्भातील प्रस्तावित विकासकामे मार्गी लावण्यासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करावी, असे आदेश दिले आहेत.

8. पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील प्रॉपर्टी फ्री होल्ड करण्याबाबत राज्यातील अन्य भूखंड 'फ्री होल्ड' करण्याची प्रकरणांवर एकत्रितपणे कॅबिनेट बैठकीत आगामी १५ दिवसांत निर्णय घेण्यात येणार आहे.

9. पिंपरी-चिंचवडमधील इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाला (नमामी इंद्रायणी) चालना देण्यासाठी 'पीएमआरडीए'चे आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी स्वतंत्र अधिकारी नियुक्त करावा. त्याद्वारे पर्यावरण विभागाशी संबंधित 'क्लिअरन्स' आणि अन्य बाबतीत नियोजन करण्याचे आदेश दिले आहेत.

> “ पिंपरी-चिंचवड शहरासह भोसरी विधानसभा मतदार संघातील प्राधिकरण हद्दीतील नागरिकांच्या मिळकती 'फ्री होल्ड' करण्याबाबत आगामी कॅबिनेट बैठकीत अंतिम निर्णय होईल. यासह इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प, महावितरण संदर्भातील प्रलंबित कामे, पोलीस आयुक्तलाय उभारणीसाठी निधी, इको टुरिझम पार्क, मेट्रोचे नवीन मार्ग विकसित करणे यासह प्रतिबंधित क्षेत्रातील एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये बदल करण्याबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आश्वसित केले आहे. तसेच, आयआयएम, नागपूर या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शैक्षणिक संस्थेचा शाखाविस्तार पिंपरी-चिंचवडमध्ये करण्यासाठी ७० एकर जागा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवडकरांच्या हिताच्या दृष्टीने महायुती सरकार सकारात्मक भूमिकेतून निर्णय घेत आहे, ही बाब शहराच्या शाश्वत विकासासाठी महत्त्वपूर्ण आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.**

# एकाच दिवसात बुजवले शहरातील 989 खड्डे

## 8 स्वतंत्र पथके कार्यरत : सर्व भागांची पाहणी करून बुजवलेल्या खड्ड्यांबाबत सादर केला जातोय दैनंदिन अहवाल

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील रस्त्यांवर असलेले खड्डे बुजवण्यासाठी विशेष पथकांद्वारे युद्धपातळीवर काम सुरू आहे. महापालिका आयुक्त आणि अतिरिक्त आयुक्तांकडून देखील विविध प्रभागात प्रत्यक्षात भेट देऊन पाहणी केली जात आहे. दरम्यान, नागरिकांकडून प्राप्त झालेल्या खड्ड्यांबाबतच्या तक्रारीचे तातडीने निराकरण करण्याच्या सूचना आयुक्त शेखर सिंह यांनी दिल्या आहेत.

पिंपरी-चिंचवड शहरातील आढळून आलेल्या खड्ड्यांपैकी महापालिकेच्या वतीने गुरुवारी (दि. ७) दिवसभरात सुमारे ९८९ खड्डे बुजवण्यात आले आहेत.



क्षेत्रीय कार्यालय निहाय ८ स्वतंत्र पथकांमार्फत खड्डे बुजवण्याची कार्यवाही युद्ध पातळीवर सुरू आहे. तसेच उर्वरित खड्डे तातडीने बुजवण्याची सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आली आहे. खड्डे बुजवण्यासाठी नेमलेल्या पथकाने सर्व भागांची पाहणी करून बुजवलेल्या खड्ड्यांबाबत दैनंदिन अहवाल सादर करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत, तर कोणत्याही भागात खड्ड्यांबाबत आलेल्या तक्रारींचे तत्काळ निराकरण करण्याचे निर्देश सर्व पथकांना देण्यात आलेले आहेत.

महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयाच्या स्तरावर खड्डे बुजवण्यासाठी फिरते पथके नेमण्यात आले आहेत. तसेच क्षेत्रीय अधिकारी आणि स्थापत्य कार्यकारी अभियंता यांच्या अधिपत्याखाली असलेले संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांसोबत परिसरातील रस्त्याची पाहणी करून खड्डे बुजवण्याची मोहीम राबवण्यात येत आहे. या खड्डे बुजवण्याच्या कामासाठी सुमारे २१ जेसीबी, ७ हॅण्ड रोलर, ३२ टेम्पो, १ हॅण्ड कॉम्पेक्टर, १४ ट्रॅक्टर, ४ ब्रेकर आणि १ डम्पर आदी मशिनरींचा वापर करण्यात आला.

> “ रस्त्यांमध्ये आढळून आलेले खड्डे बुजविणे, पाण्याचा निचरा करण्यासाठी मार्ग करून देण्याबाबतची कार्यवाही पथकांमार्फत जलदगतीने करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. या व्यतिरिक्त, रस्त्यांवर बेकायदेशीरपणे बांधकाम साहित्य ठेवणे, अतिक्रमण करणे, राडारोडा टाकणे, रस्त्यांमध्ये बेकायदेशीरपणे खोदकाम करणे, चर खोदणे असे प्रकार आढळून आल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.
>
> **- मकरंद निकम, शहर अभियंता, महापालिका.**

# वाहतूक कोंडीमुळे कर्मचाऱ्यांचा रोज एक तास वाया

## कर्मचाऱ्यांना कुटुंबाला वेळ देता येत नाही : मर्सिडीज-बेंझचे प्रमुख संतोष अय्यर यांची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

चाकणमधील वाहतूककोंडीमुळे कर्मचाऱ्यांच्या प्रवासाचा रोजचा सुमारे एक तास वाढला आहे. त्यामुळे कंपनीला बसच्या वेळापत्रकात बदल करावा लागला आहे. प्रवासात एक तास अधिक वाढल्याने कर्मचाऱ्यांना कुटुंबाला वेळ देता येत नाही. त्याचा परिणाम त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनाच्या संतुलनावर होत आहे, अशी माहिती मर्सिडीज-बेंझ इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष अय्यर यांनी गुरुवारी दिली.



मर्सिडीज-बेंझचा उत्पादन प्रकल्प चाकण औद्योगिक वसाहतीत आहे. चाकणमधील वाहतूककोंडीमुळे अनेक उद्योगांना मोठा फटका बसत आहे. याबाबत विचारणा केली असताना संतोष अय्यर म्हणाले, की चाकणमध्ये वाहतूककोंडीची समस्या आहे. वाहतूककोंडीची समस्या ही सकाळच्या वेळी फारशी नाही; मात्र, संध्याकाळी अधिक तीव्र स्वरूपात जाणवते. आमच्या कर्मचाऱ्यांच्या प्रवासाचा रोजचा वेळ एक तासाने वाढला आहे. कर्मचाऱ्यांसाठीच्या बसच्या वेळापत्रकातही त्यानुसार बदल करण्यात आले आहेत. कर्मचाऱ्यांचा एक तास प्रवासात रोज वाया जात असल्याने त्यांचा कुटुंबाला देण्याचा वेळ एक तासाने कमी होतो. त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनाच्या संतुलनावर याचा परिणाम होत आहे.

चाकण औद्योगिक वसाहतीतील (एमआयडीसी) कोंडी सोडविण्यासाठी तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी आम्ही सरकारकडे केली आहे. सरकारकडून यासाठी तातडीच्या उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. चाकणमधील परिस्थिती १५ ते २० दिवसांत सुधारेल, अशी हमी सरकारने दिली आहे. त्यामुळे भविष्यात वाहतूककोंडी कमी होईल, अशी आशा आहे, असे अय्यर यांनी स्पष्ट केले.

### मर्सिडीजच्या दोन नवीन मोटारी सादर

» मर्सिडीज-बेंझच्या वतीने जीएलसी ४३ ४मॅटिक कूपे आणि सीएलई ३०० कॅब्रिओलेट एमजी लाइन या दोन मोटारी सादर करण्यात आल्या. या वेळी संतोष अय्यर म्हणाले की, पुण्यात आमची विक्रीतील वाढ ११ टक्के आहे. त्यातही एकचतुर्थांश मोटारी या टॉप एण्ड मॉडेल आहेत. देशातील एकूण विक्रीत पुण्याचा वाटा तीन टक्के आहे. त्याचबरोबर मर्सिडीजच्या इलेक्ट्रिक मोटारींनाही मागणी वाढत आहे.

> चाकणमधील वाहतूककोंडीची समस्या सोडविण्यासाठी रस्त्यांवरील अतिक्रमणे काढण्यात आली आहेत. या ठिकाणी तातडीने रस्त्यांचे विस्तारीकरण करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर वाहतूक नियमनासाठी पोलिसांनी अधिक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची गरज आहे. वाहतूककोंडी सोडविण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजनांवर भर द्यायला हवा.
>
> - दिलीप बटवाल, सचिव, फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीज.

> चाकण चौकातील अतिक्रमणे काढण्यात आली आहेत. कंपन्या सुटण्याच्या वेळेत जड वाहनांना प्रवेश बंदी करण्यात आली. मर्सिडीज कंपनीसमोरील रस्त्यासह इतर रस्त्यांवरील खड्डे तात्पुरते बुजविण्यात आले आहेत. दीर्घकालीन खड्डे दुरुस्तीसाठी निविदा काढण्यात येणार असून, पावसाने उघडीप दिल्यानंतर हे काम लवकरात लवकर पूर्ण केले जाईल.
>
> - एस. एन. चौडेकर, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

# मोशीतील न्यायालयाच्या इमारतीचे बांधकाम सुरु

## नियोजित जिल्हास्तरीय न्यायालय उभारणीचे काम वेगात : दोन वर्षांच्या आत उभारणार सर्व सोईसुविधांनी युक्त इमारत

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडसाठी स्वतंत्र जिल्हास्तरीय न्यायालय उभारण्याबाबत कार्यवाही सुरू असून, त्यासंबंधीचे इमारतीच्या कामाला गती मिळाली आहे. पाच महिन्यांपूर्वी या कामाचे आदेश देण्यात आले असून, आतापर्यंत जवळपास दहा टक्के काम पूर्ण झाले आहे. येत्या दीड वर्षांत हे काम पूर्ण करण्याचा मानस सर्वाधिक बांधकाम विभागाने व्यक्त केला आहे. सध्या पावसामुळे कामाला अडथळा निर्माण झाला असून, पावसाळ्यानंतर काम अधिक वेगाने सुरू होईल.



मोशी सेक्टर नं. १४ मधील १५ एकर जागेमध्ये पिंपरी-चिंचवड येथील न्यायसंकूलाच्या इमारतीच्या पहिल्या टप्प्याचे बांधकाम हाती घेतले आहे. मार्च-एप्रिल या दरम्यान या कामाची वर्क ऑर्डर देण्यात आली. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने ठेकेदार नेमला असून, खोदकाम आणि सपाटीकरण्याचे काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे बहुतांश काम पूर्ण झाल्याची माहिती तेथे असलेल्या ठेकेदाराने दिली. या ठिकाणी खाली खडक असल्याने ते फोडण्यासाठी मोठी कसरत करावी लागली. पोकलेन जेसीबीच्या माध्यमातून या ठिकाणी काम सुरू आहे. मात्र जुलै महिन्याच्या अखेरीस पावसाचा जोर वाढल्याने कामाची गती कमी झाली होती. मात्र आता पावसाचा जोर कमी झाल्याने गती वाढवण्यात येणार आहे.

आराखड्यानुसार २५ न्यायालये उभारण्यात येणार आहे. त्यापैकी दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर - १२, वरिष्ठ स्तर- ७, जिल्हा व सत्र न्यायालय ६ व त्यास अनुसरून निवासस्थाने मंजूर झालेले आहेत. या बांधकामास अंदाजे १२४.५ कोटी रूपये मंजूर झालेले आहेत. न्यायसंकूलाचे बांधकाम २४ महिन्यामध्ये पूर्ण करायचे आहे, हे काम दोन वर्षांमध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे. कारण, सद्यस्थितीत न्यायालय भाडेतत्त्वावर कामकाज सुरू आहे. त्यामुळे न्यायालयास हक्काची जागा मिळणे आवश्यक आहे. दरम्यान, पहिले दोन ते अडीच महिने नुसते खडक फोडण्या मध्ये गेले. त्यानंतर आता फुटींग करण्यात आली आहे. मात्र पावसामुळे त्यात पाणी साचले आहे. सध्या पाऊस ओसरल्याने कामाची गती वाढेल.

न्यायालयाच्या प्रस्तावित इमारतीच्या कामासंदर्भात पाठपुरावा सुरू आहे. काही दिवसांपूर्वीच या ठिकाणची पाहणी केली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाशी देखील बोलणे सुरू आहे. लवकर काम पूर्ण होऊन नव्या न्यायालयात काम सुरू व्हावे, अशी आमच्या अपेक्षा आहे. त्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. येत्या काही दिवसात या परिसरात देशी झाडे लावण्यात येणार आहेत, अशी माहिती पिंपरी-चिंचवड एडवोकेट बार असोसिएशनचे सचिव धनंजय कोकणे यांनी दिली.

### न्यायालयास मिळणार हक्काची जागा

» पिंपरी-चिंचवड शहरामध्ये न्यायालय कामकाज हे अनेक वर्षांपासून महापालिकेच्या इमारतीमध्ये सुरू आहे. यापूर्वी मोरवाडी न्यायालयात अवघ्या पाच बेंचवर काम सुरू होते. त्यानंतर नेहरूनगर या ठिकाणी हे न्यायालय स्थलांतर केले आहे. त्यामुळे न्यायाधीशांची संख्याही वाढली आहे. मात्र, वाढती लोकसंख्या आणि पोलीस ठाण्याची संख्या लक्षात घेता हे न्यायालय देखील अपुरे पडत आहे. त्यामुळे जिल्हास्तरीय न्यायालय होणे अपेक्षित आहे. जेणेकरून पक्षकारांना न्याय मिळण्यासाठी वाट पहावी लागणार नाही.